पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ५४

**सभावृत्तांत**

दिनांक- २.४.२०१३ वेळ- दुपारी ३.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २/४/२०१३ रोजी दुपारी ३.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जगताप नवनाथ दत्तू - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
६) मा.भालेकर अरुणा दिलीप
७) मा.वाघेरे सुनिता राजेश
८) मा.महेशदादा किसन लांडगे
९) मा.बारणे माया संतोष
१०) मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
११) मा.लोंढे गणेश नारायण
१२) मा.कदम सदगुरु महादेव
१३) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
१४) मा.शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.प्रकाश कदम - अति.आयुक्त, मा.कारचे, मा.कुलकर्णी, मा.गावडे, मा.झुरे, मा.दुरगुडे,– सहाय्यक आयुक्त, मा.घाडगे – मुख्य लेखापरीक्षक, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहरअभियंता, मा.सुरगुडे – विकास अभियंता, मा.चव्हाण – सह शहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.पवन साळवे - अति.वै.अधिकारी, मा.दुधेकर, मा.ढगे, मा.चव्हाण, मा.रामदास जाधव, मा.शरद जाधव, मा.थोरात, मा.चिंचवडे, मा.साळवी, मा.पठाण,मा.लडकत, मा.पिरजादे,मा.दांगट, मा.बरशेटटी, मा.सय्यद - कार्यकारी अभियंता, मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मा.चव्हाण – आरोग्य कार्यकारी, मा.पोमण – संगणक अधिकारी,मा.देव लेखाधिकारी (जकात) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-</u>

**<u>विषय क्र. २५</u>** - वाय.सी.एम.रुग्णालयाच्या अंतर्गत पोस्ट मार्टेम सेंटर विभागामध्ये वर्ग ४ मधील कर्मचा-यांच्या करार पध्दतीने एकत्रित नेमणूका करणेबाबत.

**<u>विषय क्र. २६</u>** - मानधनावरील स्टाफनर्स कर्मचा-यांचे मानधनवाढीबाबत.

**<u>विषय क्र. २७</u>** - श्री.आवाड रविकुमार पंढरीनाथ गटरकुली यांचे सेवानिवृत्तीबाबत. मा.गणेश लोंढे,मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव.

**<u>विषय क्र. २८</u>** पवनाथडी जत्रा २०१३ अंतर्गत नृत्यस्पर्धा आयोजित करणेबाबत. मा.गणेश लोंढे, मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

अ) दिनांक २२/३/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक - ५१) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले .

ब) दिनांक २६/३/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक - ५२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले .

-------

ठराव क्रमांक – ३२०५ विषय क्रमांक – १
दिनांक – २/४/२०१३ विभाग – भूमि आणि जिंदगी
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक–मा.गणेश लोंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.भूजि/६/कावि/८६/२०१३ दि.२८/२/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन-

कै.अंकुशराव लांडगे नाट्यगृह भोसरी येथील उपहारगृह व बहुउद्देशीय हॉल नमुद केलेप्रमाणे भाडेदराने देणेसाठी सदर नाट्यगृहामधील बहूउद्देशीय हॉलचे मासिक भाडे ठरविणेस व व्यवस्थापकांमार्फत नागरीकांना, संस्थांना भाड्याने देणेस व उपहारगृह कमाल ११ महिन्यासाठी प्रस्तावात नमुद दराने प्रभाग स्तरावर वितरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर हॉलचा भाडेदर प्रतिदिन र.रु.५५००/- (प्रतिमहा र.रु. १,५९,५००/- ३० दिवस **=** र.रु. ५,३१७/- **i.e.**र.रु.

५,५००/- व प्रतिवर्षी १२.५०% भाडेवाढ करणे) याप्रमाणे ठरविणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | तपशिल | क्षेत्र | नगररचना विभागातील भाडेदर प्रति चौ.फुट, प्रतिमहा (मनपा व शासन कराव्यतिरिक्त) | एकूण मासिक भाडेदर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाट्यगृहा मधील बहुउद्देशीय हॉल | २९०० चौ. फुट | र.रू.५५/- प्रति चौ.फुट प्रतिमहा | १,५९,५००/- | प्रतिवर्ष १२.५ % भाडे वाढ करणे. |
| २ | नाट्यगृहा मधील उपहारगृह (कॅन्टीन) अ)तळमजला उपहारगृह | १७६.४९ चौ.फुट | र.रू.६६/- प्रति चौ.फुट प्रतिमहा | ११,६५०/- | प्रतिवर्ष १२.५ % भाडे वाढ करणे. |
| | ब)१ ला मजला उपहागृह | १७६.४९ चौ.फुट | र.रू.५५/- प्रति चौ.फुट प्रतिमहा | ९,७१०/- | प्रतिवर्ष १२.५ % भाडे वाढ करणे. |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२०६ विषय क्रमांक –२

दिनांक – २/४/२०१३ विभाग – वायसीएमएच

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वाययीएमएच/ऍकॅड/कावि/३६/१३दि.१४/३ /२०१३.

विषय - MUHS-PCMC यांचे संयुक्त विद्यमाने सुरू होणा-या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शासनाकडील आवश्यकता प्रमाणपत्राचे छाननी शुल्क अदा करणेबाबत.

विषय क्रमांक २ दप्तरी दाखल करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२०७ विषय क्रमांक – ३

दिनांक – २/४/२०१३ विभाग – विद्युत

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक –मा.अरुणा भालेकर

संदर्भ:- मा.विकास अभियंता(वि/यां) यांचे जा.क्र.वि/नि/५/कावि/१५३/२०१३ दि.१३/३ /२०१३.

विषय -. विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.८/१२-१३ मधील कामाचा करारनामा करणेस मंजूरीबाबत.

विषय क्रमांक ३ दप्तरी दाखल करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२०८ विषय क्रमांक – ४

दिनांक – २/४/२०१३ विभाग – प्रशासन

सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशासन/०४/कावि/२१९/२०१३दि.१८/३/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

१)श्री.बी.के.गायकवाड, सहाय्यक अभियंता, स्थापत्य विभाग २)श्री.आर.डी.सुर्यवंशी, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य विभाग या कर्मचा-यांना दिनांक २२/३/२०१३ ते ३०/३/२०१३ या कालावधीत सिंगापूर व सेऊल येथे परदेशामध्ये **International Study tour for leaders Programme** या अभ्यासदौ-यास पाठविणेस व त्याकरिता होणार खर्च अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२०९ विषय क्रमांक – ५

दिनांक – २/४/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.गणेश लोंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/८३/२०१३दि.२०/३/२०१३.

विषय – स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२६/२०१२-१३ मधील अन्वये, प्रभाग क्र.८९ येथील ब्रम्हवृंद कॉलनी व नवीन बाणेर पुलाकडे जाणा-या रस्त्यास सी.डी.वर्क बांधणेबाबत.

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२१०  विषय क्रमांक – ६

दिनांक – २/४/२०१३  विभाग – स्थापत्य

सुचक – मा.सदगुरु कदम  अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/८८/२०१३ दि.२०/३/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

आधुनिक मशिनरीच्या सहाय्याने मनपाच्या हद्दीतील बहुमजली अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेचे काम कालमर्यादीत असलेने, तसेच निविदा काढुन काम करणेस पुरेसा अपुरा कालावधी असलेने आणि कामाचे स्वरूप विचारात घेता अनधिकृत बांधकामावर कारवाई करणेसाठी विषयांकीत कामास त्याच दराने (र.रू.२५५/- प्रति चौ.मी.) प्रमाणे सुधारीत र.रू.४९,९८,०००/- इतक्या खर्चास आणि प्रस्तुतचे काम मे.मत्ते अन्ड असोसिएट्स यांचेकडून करून घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२११  विषय क्रमांक – ७

दिनांक – २/४/२०१३  विभाग – स्थापत्य ब मुख्यालय

सुचक – मा.आशा शेंडगे  अनुमोदक–मा.अविनाश टेकावडे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/ले-१/कावि/७५/२०१३दि.२१/३/२०१३.

विषय – औंध रावेत रस्ता सुधारणीकरण अंतर्गत (भाग-१) बाधित रस्ते असलेले संरक्षण विभागाचे निवासी गाळे बांधणेबाबत.

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२१२  विषय क्रमांक – ८

दिनांक – २/४/२०१३  विभाग – विद्युत मुख्य कार्या.

सुचक – मा.चंद्रकांत वाळके  अनुमोदक– मा.अरुणा भालेकर

संदर्भ:- मा.विकास अभियंता(वि/यां) यांचे जा.क्र.वि/नि/५/कावि/१६५/२०१३ दि.२५/३/२०१३.

मा. विकास अभियंता(वि/यां)यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.८/१२-१३ मधील अ.क्र.१५ अन्वये, सन १२-१३ वर्षाकरीता वाय.सी.एम.रूग्णालयामधील विद्युत उपकरणांची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.कुमार इलेक्ट्रिकल ॲन्ड ट्रेडिंग कंपणी (नि.र.रू.१८,९६,५९३/- [र.रू.अठरा लाख शहान्नव हजार पाचशे त्र्यान्नव] पेक्षा २०.९९ **%** कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ३२१३ विषय क्रमांक – ९

दिनांक – २/४/२०१३ विभाग – विद्युत मुख्य कार्या.

सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- मा.विकास अभियंता(वि/यां) यांचे जा.क्र.वि/नि/५/कावि/१६६/२०१३ दि.१५/३/२०१३.

मा. विकास अभियंता(वि/यां)यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.८/१२-१३ मधील अ.क्र. ३७ अन्वये, यशवंतराव चव्हाण रूग्णालय येथिल विद्युत संच मांडणीचे वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे व ४, ५ व ६ व्या मजल्याचे विद्युतीकरणाचे नुतनीकरण करणेकामी मे.कुमार इलेक्ट्रिकल्स अँन्ड ट्रेडिंग कंपणी (नि.र.रू.१६,७०,५४०/- [र.रू. सोळा लाख सत्तर हजार पाचशे चाळीस] पेक्षा १८.९९ % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२१४ विषय क्रमांक – १०

दिनांक – २/४/२०१३ विभाग – विद्युत-भुगयो

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.कार्यकारी अभियंता(वि) यांचे जा.क्र.वि/भुगयो/तां/७१/२०१३ दि.२१/३/२०१३.

मा. कार्यकारी अभियंता(वि) यांनी शिफारस केलेप्रमाणे

म.रा.वि.वि.कं.यांना चिखली स.नं.१२५३ येथील मैला पंप हाऊस येथे नवीन विजपुरवठाकामी वीजभार मंजुरीपोटी र.रू.२,७१,७३०/- (र.रू.दोन लाख एकाहत्तर हजार सातशे तीस) तातडीने भरणेत आलेने त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२१५ विषय क्रमांक – ११

दिनांक – २/४/२०१३ विभाग – पाणीपुरवठा ब प्रभाग

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.गणेश लोंढे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/बप्र/कावि/१५/१०८/१३ दि.२५/३/२०१३.

विषय – जे.एन.एन.यु.आर.एम.फेज-२ अंतर्गत चिंचवड बिजलीनगर येथील स.नं.१९५ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेत २५.०० ल.लि क्षमतेच्या पाण्याच्या उंच टाकी बाबत.

विषय क्रमांक ११ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२१६ विषय क्रमांक – १२
दिनांक – २/४/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक–मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/१३३/२०१३ दि.२६/३/२०१३.

मा. शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२/२०१२-१३ मधील अ.क्र.१३५ अन्वये, पिंपरीनगर, अजमेरा मोरवाडी भागात विविध कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणेकामी मे.कुबेरा एंटरप्रायझेस (नि.र.रू.१४,९२,१८८/- [र.रू.चौदा लाख ब्यान्नव हजार एकशे अठ्ठ्याऐंशी] पेक्षा ३.३० **%** कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१५,१५,०९३/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२१७ विषय क्रमांक – १३
दिनांक – २/४/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक –मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/४/कावि/२८३/२०१३ दि.२५/३/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

विविध विभागांची तातडीची मागणी विचारात घेवून, यापुर्वीचे ई.नि.सु.क्र.२१/१-११-१२ अन्वये मंजूर निविदा दराने निविदाकार मे.अमृत मुद्रणालय, चिंचवड यांचेकडून विविध ४० प्रकारचे वाढीव खरेदी छपाई साहित्य एकूण र.रू.६,६८,३९८/- (र.रू.सहा लाख अडुसष्ट हजार तीनशे अठ्य़ान्नव) व मे.आशिष एंटरप्रायजेस, चिंचवड यांचेकडून विविध १५ प्रकारचे वाढीव खरेदी छपाई साहित्य एकूण र.रू.४,०५,८५७/- (र.रू.चार लाख पाच हजार आठशे सत्तावन्न) मध्ये खरेदीकामी करारनामा करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२१८ विषय क्रमांक – १४
दिनांक – २/४/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/९२/२०१३ दि.२८/३/२०१३.

मा. शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२०१२-१३ मधील अ.क्र.५ अन्वये, प्रभाग क्र.९४ किर्तीनगर मधील बॅडमिंटन हॉल व लॉन टेनिस मैदान व इतर परिसरात स्थापत्य विषयक कामे करणे कामी मे.राहुल कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.१८,६७,४१४/- [र.रू.अठरा लाख सदुसष्ट हजार चारशे चौदा] पेक्षा १९.८० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१५,७२,५४९/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२१९ विषय क्रमांक – १५

दिनांक – २/४/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक–मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/९३/२०१३ दि.२८/३/२०१३.

मा. शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२०१२-१३ मधील अ.क्र.९८ अन्वये, थेरगांव प्रभाग क्र.८२ मध्ये गावठान इतर भागात स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणेकामी मे.के कमलेश (नि.र.रू.२३,३२,३६०/- [र.रू.तेवीस लाख बत्तीस हजार तीनशे साठ] पेक्षा २०.७१ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. १९,४१,७९५/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२२० विषय क्रमांक – १६

दिनांक – २/४/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.आशा शेंडगे

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/९४/२०१३ दि.२८/३/२०१३.

मा. शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२०१२-१३ मधील अ.क्र.१०९ अन्वये, वॉर्ड क्र.९५ कवडेनगर येथे ठिकठिकाणी एफ.आर.पी. वाचनालय, मुता-या

बसस्टॉप व बेंचेस बसविणेकामी मे.साकळे असोसिएट्स (नि.र.रू.१०,८३,१००/- [र.रू.दहा लाख त्र्याऐंशी हजार शंभर] पेक्षा २३.९९ **%** कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.८,६४,४२८/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२२१ विषय क्रमांक – १७
दिनांक – २/४/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भः- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/९५/२०१३ दि.२८/३/२०१३.

मा. शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.अमुख्यालय/**HO**/१०/१ /२०१२-१३ मधील अ.क्र.१ अन्वये, अ प्रभागातील अतिक्रमण कारवाईसाठी वाहने व इ.सामुग्री पुरविणे (आधुनिक मशिनरीच्या सहाय्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील बहुमजली अनधिकृत बांधकाम पाडणे) कामी मे.मत्ते **&** असोसिएट्स (२५५ **per sqm**) हा दर स्वीकृत करून निविदा मंजूर दराने करारनामा करून घेणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

(नि.र.रू. २५,००,०००/- [र.रू.पंचवीस लाख])

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२२२ विषय क्रमांक – १८
दिनांक – २/४/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक –मा.चंद्रकांत वाळके
संदर्भः- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/७४/२०१३ दि.२८/३/२०१३.

मा. शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१९/२०१२-१३ मधील अ.क्र.१० अन्वये, वॉर्ड क्र.१० मोशी येथील विकास आराखड्यामधील ताब्यात आलेल्या आरक्षणाच्या कडेने सिमाभिंत बांधणेकामी मे.भगवंत कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.१८,६७,३५७/- [र.रू.अठरा लाख सदुसष्ट हजार तीनशे सत्तावन्न] पेक्षा २२.९९ **%** कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१५,०९,९५४/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली

वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२२३ विषय क्रमांक – १९

दिनांक – २/४/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/७५/२०१३ दि.२८/३/२०१३.

मा. शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३/२०१२-१३ मधील अ.क्र.२१ अन्वये, वॉर्ड क्र.१२ च-होली येथील निकम वस्तीकडे जाणा-या रस्त्याचे खडीकरण करणेकामी मे.बहिरट ब्रदर्स (नि.र.रू. २४,९९,७८४/- [र.रू.चोविस लाख नव्यान्नव हजार सातशे चौ-यांऐंशी] पेक्षा १८.७८ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२१,३१,८४१/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२२४ विषय क्रमांक – २०

दिनांक – २/४/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक –मा.अरुणा भालेकर

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/७६/२०१३ दि.२८/३/२०१३.

मा. शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१९/२०१२-१३ मधील अ.क्र.१ अन्वये, वॉर्ड क्र.२० करसंकलन इमारतीमध्ये फर्निचरची व स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.आर.टी.सबरवाल (नि.र.रू. २४,००,९७८/- [र.रू.चोविस लाख नऊशे अठ्ठ्याहत्तर] पेक्षा १६.४०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. २१,०७,५७८/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२२५ विषय क्रमांक – २१

दिनांक – २/४/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भः- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/७७/२०१३ दि.२८/३/२०१३.

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३/२०१२-१३ मधील अ.क्र.८५ अन्वये, वॉर्ड क्र.१३ येथील उर्वरित नाल्याचे बांधकाम करणेकामी मे.एस.बी.सवई (नि.र.रू.२४,९९,८९४/- [र.रू.चोविस लाख नव्यान्नव हजार आठशे चौ-यान्नव] पेक्षा ११.५० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२३,२३,०२६/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२२६ विषय क्रमांक – २२

दिनांक – २/४/२०१३ विभाग – संगणक

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.आशा शेंडगे

संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.संगणक/१०/कावि/९७/२०१३ दि.२८/३/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

ई-गव्हर्नन्स प्रकल्पा अंतर्गत विविध संगणक विषयक प्रशिक्षण देणेकामी मनपा अस्थापनेवरील एकूण ५५ कॉम्प्युटर ऑपरेटर कर्मचा-यां करीता प्राप्त दरपत्रकांपैकी मे.सी-डैक अँक्ट, पुणे या संस्थेकडून करारनामा न करता थेट पध्दतीने प्रशिक्षण विषयक कामकाज करून घेणेस व त्याकरीता येणा-या र.रू.४,९५,०००/- (र.रू.चार लाख पंच्यान्नव हजार) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२२७ विषय क्रमांक – २३

दिनांक – २/४/२०१३ विभाग – संगणक

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक –मा.चंद्रकांत वाळके

संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.संगणक/१/कावि/२३६/२०१३ दि.२८/३/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

संगणक विभागाचे सन २०१२-१३ चे सुधारित अंदाजपत्रकातील कर्मचारी वेतन व भत्ते या अंतर्गत अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावरून र.रू.२०,०००/- स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२२८ विषय क्रमांक – २४
दिनांक – २/४/२०१३ विभाग – वाहन दुरुस्ती कार्यशाळा
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक–मा.अविनाश टेकावडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.काशा/०४/कावि/२०५/२०१३ दि.२८/३/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

मनपाच्या आरोग्य विभागाचे वापरासाठी रोड स्विपर मशिन (चॅसिजसह)-०१ नग खरेदीकरणेकरिता प्रसिध्द करणेत आलेल्या नि.नो.क्र.५-१२-१३ भाग-०१ चे कामकाजाकरीता (नि.र.रू. १,०५,००,०००/-) नुसार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. चिंचवड पुणे-१९. यांचे दर सर्वात कमी असलेने त्यांचेकडून खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या र.रू.९४,५०,०००/- चे खर्चास तसेच सदरचे खरेदी करण्यात आलेले रोड स्विपर मशिनचे चालन व देखभाल दुरुस्ती करणेकरीता प्रसिध्द करणेत आलेल्या नि.नो.क्र.५/१२-१३ भाग-०२ चे कामकाजाकरीता (नि.र.रू.१,८४,३५,०००/-) नुसार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., चिंचवड, पुणे-१९. यांचे दर सर्वात कमी असलेने भाग-०१ व भाग-०२ मधील कामाचा एकत्रितपणे करारनामा करून घेवून सदर मशीन चालनाकरीता प्रति दिन, प्रति शिफ्टकरीता र.रू.९,२२५/- आणि सदर मशीन देखभाल दुरुस्ती करणेकरीता प्रति महिना र.रू.३४,५००/- याप्रमाणे पाच वर्ष कालावधीसाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच डिझेल पेट्रोल मधील दरात वाढ/घट झाल्यास तसेच किमान वेतनदरात वाढ/घट झाल्यास फरकानुसार बील अदा करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्षखर्चास मंजूरी देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ३२२९ विषय क्रमांक – २५
दिनांक – २/४/२०१३ विभाग – वायसीएमएच
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएच/पोमासे/कावि/११७/२०१३ दि.१/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या शवविच्छेदन कक्षामध्ये वैद्यकिय अधिका-यांच्या मदतीसाठी यापुर्वी शवविच्छेदन काम करणारे श्री. राम हुसेनप्पा रेडडी, श्री.शशीकांत रामदास जाधव, श्री.सचिन संपत घोलप, श्री.मनोज राम रेडडी यांना पुर्वीच्या अनुभवाच्या आधारे शवविच्छेदन कक्षामध्ये र.रु. ७,०००/- अक्षरी र.रु. सात हजार फक्त एकत्रित मानधनावर सफाई कामगार पदावर नेमणूक करण्यास मा.स्थायी समिती ठराव क्र. ६५१/१२ दिनांक १९/६/२०१२ चे मान्यतेनुसार आदेश क्र. वायसीएमएच/पोमासे/ १२९/ २०१२ दिनांक १७/९/२०१२ अन्वये दिनांक १८/९/२०१२ ते १७/३/२०१३ पर्यंत नियुक्ती करणेत आलेली आहे. आता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे वायसीएमएच रुग्णालयामध्ये पोस्ट मार्टेम सेंटरमधील उपरोक्त कर्मचा-यांना र.रु. ७,०००/- ऐवजी र.रु. ७,५००/- दरमहा मानधनावर नेमणूक देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२३० विषय क्रमांक – २६

दिनांक – २/४/२०१३ विभाग – वायसीएमएच

सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएच/८अ /कावि/९४/२०१३ दि.१/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

प्रस्तावात नमूद प्रमाणे मानधनावरील स्टाफनर्स कर्मचा-यांना १ वर्षापेक्षा कमी अनुभव किंवा प्रशिक्षित उमेदवार र.रु. ११०००/-, ३ ते ५ वर्षे सेवा कालावधीसाठी र.रु. १३५००/- ५ वर्षानंतर र.रु. १५०००/- अशी मानधनवाढ दिनांक १/४/२०१३ पासून देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२३१ विषय क्रमांक – २७

दिनांक – २/४/२०१३

सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक– मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.गणेश लोंढे,मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव.

मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र. प्रशा/६/कावि/३५१/२०१३ अन्वये दिनांक २५/३/२०१३ रोजी श्री.आवाड रविकुमार पंढरीनाथ, गटरकुली यांना सेवानिलंबित केले असून त्यांना एक वेतनवाढ स्थगित करुन पुन्हा सेवेत घेण्यास मान्यात देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३२३२ विषय क्रमांक – २८

दिनांक – २/४/२०१३

सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:-. मा.गणेश लोंढे, मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

पवनाथडी जत्रा २०१३, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे दिनांक ४/४/१३ ते ७/४/१३ अखेर एच.ए.कंपनी मैदान, पिंपरी - १८ येथे आयोजित केली आहे यामध्ये कार्यक्रमा अंतर्गत नृत्यस्पर्धा (बॅटल ऑफ डान्स- नृत्याचा महासंग्राम) आयोजित केली आहे याकामी प्रवेश फी ३००/-,४००/-,५००/- आकारणी करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच या स्पर्धेसाठी येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(नवनाथ दत्तू जगताप)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/३६०/२०१३
दिनांक - ०३/०४/२०१३.

प्र. नगरसचिव
पिंप्ररी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.